॥ श्रीराम समर्थ ॥ , २८ जुलै 2022

ज्ञानी आणि उदास। समुदायाचा हव्यास।
तेणे अखंड सावकास। एकांत सेवावा॥

वरवर पहाता श्री० समर्थ रामदास स्वामींचे हे वचन विसंगत वाटू शकते. ज्याला समुदाय एकत्र करायचा आहे, ज्याला लोकसंग्रहातून जनप्रबोधन साधायचे असेल त्याने एकांतसेवन करून कसे काय चालेल? असे आपल्याला वाटू शकते. परंतु संपूर्ण भारतभर ~~पायी~~ परिभ्रमण करत असताना, लोकांचे अज्ञान दूर करताना, बलोपासनेचे महत्व समजावून सांगत असताना, शेकडो मठ स्थापन करत असताना समर्थांनी आपला एकांतही सांभाळला. म्हणूनच केवळ उक्तीतून नव्हे तर कृतीतून त्यांनी समाजापुढे सदाचरणाचा आदर्श ठेवला.

कधी गलबला कधी निवळ
ऐसा कंठीत जावा काळ।
येणेकरिता विश्रांतिकाळ
फावतसे॥

(मान-४)

खनाळात जाऊनि राहे। असेही त्यांच्याबद्दल म्हटले जाते. आणि खरोखर एकांतसेवनातून, त्यांच्या तरल मनोभूमिवर जे अमूल्य विचार त्यांना स्फुरत असत, ते विचारधन ते मुक्तहस्ताने शिष्यांना वाटत असत. त्या काळची परिस्थिती विचित्र होती. परकीयांची आक्रमणे सतत होत होती. ~~सामाजिक सामान्य स्थान उरले~~ नव्हते. लोक आळशी झाले होते. ब्राह्मण आपल्या धर्मापासून च्युत झाले होते. सर्वसमोर दुराचार झाले होते. समाजाची बांधणी शिथिल झाली होती. सामान्यजनांना कोणी वाली उरला नव्हता. अशा वेळी समर्थ रामदासस्वामींचे अंतःकरण द्रवले ~~आणि~~ बुडते हे जन। देखवेना डोळा म्हणोनि कळवळा येतो मनी अशी त्यांची अवस्था झाली. भिक्षेच्या माध्यमातून त्यांनी समाजपरीक्षण केले व अज्ञान दूर करण्याचा चंग बांधला.

©www.madhaveeraghuveer.com

સાન વેળી દેશ-પરદેશાત વિજ્ઞાનામધ્યે પ્રગતિ હોઉ લાગલી હોતી. પરંતુ ત્યાચુક ધર્મ મ્હણજે મગાસલેપણા અશી કાહીંશી મનોવૃત્તિ મૂળ ધરુ લાગલી હોતી. સમર્થાંના વિજ્ઞાનાચે મહત્વ નાકારાયચે નવ્હતેચ. પણ ત્યાચબરોબર સમાજાસમોર આદર્શ નિ:સ્પૃહ, નિ:સ્વાર્થી અશા લોકનેત્યાંચે ચરિત્ર અભાવે હી દેખીલ સલમલ બાબત હોતી. ત્યા દૃષ્ટીને છત્રપતી શિવાજી મહારાજાસારખ્યા રાજા સ્વરાજ્યાચે સ્વપ્ન સાકાર કરેલ અશી અપેક્ષા હોતી.

પરંતુ ઉત્તમ રાજ્યકારભાર કરણ્યાસાઠી પ્રજા દેખીલ સમજૂતદાર, સુશિક્ષિત, ધર્માને વાગણારી હવી. લોકાંના યોગ્ય માર્ગ દાખવણાર કોણ? હાહી પ્રશ્ન સમર્થાંસમોર હોતાચ. ભૌતિક આકર્ષણાપેક્ષા શાશ્વત, ચિરંતન આનંદાચા ઠેવા મિળવૂન દેણારા આદર્શ પુરુષ સ્વાર્થરહિત અસાયલા હવા. સમાજાત બહુસંખ્ય માણસે સ્વાર્થી, પ્રપંચાત ગુંતલેલી અસલી તરી કાહી મૂઠભર માણસે જનકલ્યાણાસાઠી ઝટણારી અસતાત. નિદાન અસાયલા હવીત. તરચ સર્વસામાન્યાંચે નૈતિક ઉત્થાન હોઊ શકેલ આણિ ત્યાપાઠોપાઠ ઔદ્યોગિક, આર્થિક, સામાજિક, રાજકીય ઉન્નતિ સાધતા યેઊ શકતે.

સમર્થાંચે અનેક શિષ્ય પ્રશિષ્ય તયાર હોત હોતે. અનેક ઠિકાણી મઠ સ્થાપન ઝાલે હોતે. ઉદ્બોધનાતૂન ~~સમાજપ્રબોધન~~ જનજાગૃતી કરત અસતાનાચ ત્યાંની ગ્રંથરાજ દાસબોધ હા ગ્રંથ પરમાર્થાચી સાંગડ ઘાલણારા અલૌકિક ગ્રંથ લિહિલા. ~~ત્યા~~ ત્યાત ૨૦ દશક વ ૨૦૦ સમાસ આહેત.

પરંતુ ત્યાતહી ૧૮ વા દશક અખંડધ્યાનનિરૂપણ હા ઉત્તમ નેતા કસા અસાવા હે સાંગણારા આહે. ત્યાનંતર પહિલ દશક હા નિ:સ્પૃહલક્ષણ સાંગણારા આહે. નેતા જર ખરોખર નિ:સ્પૃહ અસેલ તરચ તો લોકાંના જવળચા વાટેલ

(७) आशा लोकोत्तराला ~~[illegible]~~ पैसा, प्रसिद्धी याचा मोह नसावा
परंतु लोकसंग्रह मात्र मोठा असावा. त्याचे वागणे एका
टोकाचे नसावे. सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची
कला त्याला अवगत असायला हवी. त्याचे वागणे
समतोल हवे. परंतु त्याच बरोबर आपल्या साधनेच्या
बाबतीत तडजोड करता कामा नये. सर्व काही सहनशीलता
ठेवून स्वाधीन आणि कर्तेपणाने कुठेच अडकू नये.
समाजात वावरताना कितीतरी उद्वेगजनक गोष्टी घडतील
परंतु तरीही त्याने आपल्या समाधानाचा भंग होऊ देऊ नये.
समाजाला सन्मार्गावर नेणारा नेता कसा असावा हे सांगताना
समर्थ म्हणतात —

नित्यनेम सांडू नये । अभ्यास बुडो देऊ नये ।
परतंत्र होऊ नये । काही केल्या ॥ १४.९.२२॥
नेणपण सोडू नये । महंतपण सांडू नये ।
द्रव्यासाठी हिंडो नये । कीर्तन करीतां ।

लोकांचे कीर्तन केले तर त्यात रुक्ष कवित्वाचा भाग येतो व
परमेश्वराच्या गुणवर्णनातील खरा भक्तिभाव हरवून जातो.
समर्थ स्वतः महंतांचे महंत होते. त्यामुळे या समासात
सांगितलेली प्रत्येक गोष्ट म्हणजे त्यांच्या स्वानुभवातून उतरलेले
आहे. <u>येके स्थळी राहू नये</u> - विशिष्ट स्थानात राहिल्यामुळे
त्या ठिकाणाविषयी, लोकांविषयी आसक्ती निर्माण होते.
एका प्रकारचे साचलेपण येऊन विचारांची व्यापकता कमी
होत जाते आणि इतर ठिकाणचे लोक या उपदेशापासून वंचित
राहतात. <u>अपमानिता भिवो नये</u> - समाज हा रुचिवैचित्र्याने
भरलेला आहे. काही लोक थोर पुरुषांचा सन्मान करतात तर
काही लोक नावे ठेवतात. अपमान करतात. स्वतः समर्थांवर
~~[illegible]~~ वर असे अपमानाचे, प्रसंगी मार खाण्याचे प्रसंगही
आले. देहगावचे शेतातील कणसे खाल्ल्याबद्दल त्यांना मार
खावा लागला होता. तरीही त्यांची शांती ढळली नाही

© www.madhaveeraghuveer.com

सावधपणा सोडू नये - विवेक वैराग्या प्रमाणेच सामर्थ्याचा भर दक्षतेवर होता. सदा सर्वकाळ सावधानता बाळगत असत.

महंतपणा सोडू नये - लोकांमध्ये लोकांसारखे होऊन मिसळून तरी आपले महंतपण विसरू नये. लोकोद्धाराचे जे कार्य हाती घेतले आहे, त्याचा विसर कधीही पडू देत नसत. त्यांच्या ठायी असलेले असामान्यत्व सामर्थ्याचे गमक आहे.

अशुद्ध पोथी लिहो नये - व्यासंगीपणावर (लेखन) सामर्थ्याचा भर होता. गलथानपणा, ढिसाळपणा त्यांना आवडत नसे. लिखाणाच्या बाबतीत तर ते आग्रही होते. वळण शब्दांमधील अंतर, शाई बोरु तसेच ग्रंथाची बांधणी याबद्दल त्यांचे काही नियम होते व ते स्वतः तसे वागत. शिष्यांकडूनही तसे करवून घेत असत.

याव्यतिरिक्त ज्ञान, प्रखर वैराग्य, विवेकसंपन्नता, धैर्य, अखंड स्वरूपानुसंधान, निरपेक्ष वृत्ती, शुद्ध नीतिमत्ता, उद्यमशील प्रसंगावधान अशा अनेक सद्गुणांनी हा समास समृद्ध आहे.

② समाजाचे निरीक्षण जवळून करण्यासाठी भिक्षेसारखे दुसरे साधन नाही असे समर्थ सांगत. भिक्षेला तर त्यांनी कामधेनु किंवा अमरवल्ली म्हटले आहे. अमरवल्ली - सदाचारी नवख्या समाजाला जड न होता. कामधेनु - भिक्षेसाठी खूप फिरावे लागते. देह कष्टवल्याने तो कणखर तर होतोच. समाज अवलोकन, नवीन ओळखी, स्वातंत्र्य आणि भगवत् प्राप्ती होते. कुरकुरीतपणा टिकून राहतो. भिक्षा वाचवी विपत्ति - सर्व आर्थिक स्तरातील माणसांना नीट जाणून घेता येते. सामाजिक, राजकीय परिस्थितीचा अंदाज येतो. पुढे संकट येणार असेल तर त्याचा अंदाज येतो सामान्य लोकांमध्ये मिसळल्याने समाजाची नाडी नीट समजते. निर्भयता, अजातशत्रुत्व येते.

कुग्रामे अथवा नगरे। पहावीं घरांची घरें।
भिक्षामिसें लहानथोरें। परीक्षून सोडावीं॥

भिक्षा हे माणसे जोडण्याचे / ओळखण्याचे साधन होते. भिक्षेने अनेक रत्न मिळाले — वेण्णा, सतीबाई, कल्याण, आक्का, भीमस्वा

© www.madhaveeraghuveer.com

विचार संक्रमण हे मुख्य उद्दिष्ट होते. 

अखंड शिकवणे अभ्यास/ध्यास बारे जना परदेस /
इकडे तिकडे स्वदेस / भुवनत्रयी ||

या शिकवणीमधून या अकिंचन महात्म्याने देशी उभा-आडवा फिरून काढला आणि समर्थपदवीला पोहोचला.

भिक्षा - - -

③ भिक्षेसाठी गावोगावी जात असताना समर्थांच्या चालण्याची ~~वेग~~ गति वेगवान होती. आणि चालताना ते मुखाने श्लोक, भजन, अभंग, भारूड, इत्यादी म्हणत असत. त्यांचे वाङ्मयवैभव अफाट आहे. अशांतच शारदेचे त्यांना वरदान होते. त्यांनी सर्व प्रकारच्या काव्यरचना केल्या आहेत आणि याच त्यांच्या स्वानुभूतीचे प्रतिबिंब दासबोधातील कविलक्षण या समासात पडलेले दिसते. (खरेतर संतांच्या रचनांमधून सामान्य माणसांना भक्तिमार्गाने जाण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळते. त्यांच्या मनात भगवंताविषयी प्रेम व निष्ठा निर्माण होतो आपलेपणा वाटू लागतो. श्रोते/साधक प्रथम त्यांच्याकडे आकर्षित होतात. परंतु या कवितांतील शब्दचमत्कृति, रसभाव, चैतन्य, सौंदर्य, पावित्र्य यांकडे ओढला जातो तेव्हा त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळते. धीट, पाठ, प्रासादिक असे तीन प्रकार ढोबळमानाने पहायला मिळतात. आपल्या मनात जे जे येते त्यावर जबरदस्तीने काव्य करणे म्हणजे धीट काव्य आणि निरनिराळे पुस्तके ग्रंथ अभ्यासून त्यातील रचना/रचनां काव्याप्रमाणे रचना करणे हे पाठकाव्य. मात्र कविता रचण्याची शक्ति संपादन करून जे जे दृष्टीस पडेल त्याला कविता केली आणि ~~त्यात~~ती भगवद्भावनेवाचून असेल तर ते ~~प्रासादिक~~ धीटपाठ काव्य आहे. अशा कवितांमध्ये नवरसांचा आविष्कार असतो. मात्र अशा कवितांनी परमार्थ साधत नाही. उलट कधी पोटासाठी मानवाची खोटी स्तुती करावी लागते. पंडितराज जगन्नाथ हे फार मोठे कवी

© www.madhaveeraghuveer.com

होते. परंतु त्यांनी आपल्या प्रतिभेचा उपयोग करून दिल्लीच्या बादशहाची भरमाप स्तुती केली. त्याचे वर्णन करताना तो म्हणतो — दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा।

परंतु परमेश्वर प्रसन्न झाल्यावर उत्स्फूर्तपणे जे शब्द अंतरातून येतात वाणीतून प्रगट होतात ते ते सर्व प्रासादिक काव्यच आहे. अर्थातच जीवनमुक्त पुरुषाची भक्ति जेव्हा शब्दरूप घेऊन प्रकट होते तेव्हा ती रचना प्रासादिक होते. स्फूर्ति हे ईश्वरी वरदान आहे. ते सर्वांना साधत नाही. परंतु संतांच्या हृदयातून अशी कविता सहजतेने जन्म घेते व श्रोत्यांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचते. एके हृदयीचे ते हृदयी, अशी भावविभोर अवस्था करणारी कविता म्हणजे साक्षात शारदेचे दर्शनच आहे. म्हणूनच कवींना शब्दसृष्टीचे ईश्वर म्हटले जाते.

अशा कवितेमुळे साधकाचे श्रोत्याचे अंतःकरण भक्तीने भरून जाते. या भक्तीचा सर्वांग परिपोष आपल्या कीर्तनामध्ये बघायला मिळतो. १४ व्या दशकातील ४ थ्या समासात भक्तिरंगाला आणखी एका गुणाची जोड मिळाली आहे. कवितेत चमत्कृति, वर्णालंकार, अर्थालंकार, यमक, अनुप्रास असतात. त्यामुळे काव्याला शोभा तर येतेच पण ऐकणाऱ्याच्या मनाचा ते ठाव घेते. इथे समर्थांनी अनुप्रास साधला आहे. क पासून ह पर्यंत एकेक अक्षर वारंवार योजून गंमत तर आणली आहेच परंतु त्याबरोबर कीर्तन प्रकाराचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आणि उत्तम कीर्तनाचे हे वैशिष्ट्यच आहे. आपल्या वाणीने श्रोत्यांना गुंगवून ठेवत अध्यात्माच्या एकेका अंगाचा विचार करायला

©www.madhaveeraghuveer.com

श्रोत्यांना प्रबुद्ध करायचे. ही कला अत्यंत समर्थांना ज्ञात असावी होतीच. कीर्तनकाराच्या अंगी कोणकोणते गुण असावेत हेही यात सविस्तर सांगितले आहे. भगवंताला कीर्तन मनापासून आवडते. कीर्तनात काव्य, गायन, नृत्य, रंजन विनोद सर्व असावे. प्रेमाचे सात्विक भाव असावेत. कीर्तनकार हा अध्यात्ममार्गावरील नेता असतो. त्याच्याकडे उत्तम वक्तृत्व तर असावेच. सन्मार्गाचा प्रसार करणारा कीर्तनकार श्रोत्यांना व भगवंताला प्रिय असतो. अर्थात तो निःस्वार्थी असावा. पोटासाठी, पैशासाठी किंवा उत्पन्नाचा मार्ग म्हणून कीर्तनाकडे पहाणे हे सर्वथा चूक आहे.

(५) कारण कीर्तनात प्राधान्याने हरिकथा असते. एकाविचाराने जमलेल्या लोकांच्या समुदायाला भक्तिने भारलेल्या प्रेममय वातावरणात नेऊन सोडण्याचे काम कीर्तनाने वा हरिकथेने साधता येते. सर्वसामान्य मनुष्य हा अंतर्मुख होतोच. त्याच्या मनामध्ये अध्यात्माचे बी रुजायला सुरुवात होते/ एखाद्या मंदिरामध्ये सगुण मूर्तिचे साकार रूप असेल त्याच्या समोर हरिकथा करावी. सगुणातून निर्गुणात जाणे ही जरी परमार्थमार्गातील अंतिम पायरी असली तरी देवळात हरिकथेमध्ये उगीचच निर्गुणाचे माहात्म्य सांगून श्रोत्यांचा बुद्धिभेद करू नये. उलट देवाचे वैभव, त्याच्या लीला सांगून रसनिर्मिती करावी. अधून मधून श्रोत्यांना टाळ्या वाजवायला सांगून त्यांना सहभागी करून घ्यावे. श्रोत्यांचे गुणदोष काढून त्यावर बोलू नये. ज्या प्रकारचे श्रोते असतील तशी कथा निवडावी.

मन ठेवून ईश्वरीं । जो कोणी हरिकथा करी
तोचि ये संसारी । धन्य जाणा ।
जयास हरिकथेची गोडी । उठे नीच नवी आवडी ।
तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ॥

©www.madhaveeraghuveer.com

હરિદાસ હા સમાજપ્રબોધન કરણારા લોકપ્રતિનિધિ અસતો
સ્વતઃ કડે બ્રહ્મજ્ઞાન અસૂનહી લોકાંશી જો આપલેપણાને,
અભિમાનરહિત વૃત્તીને વાગતો તો ખરા ઉત્તમ હરિદાસ અસે
સમર્થાંચે પ્રતિપાદન આહે.

હરિચિયા દાસા હરિ દાહી દિશા।
ભાવ જૈસા તૈસા હરિ એક॥

અસા હરિદાસ હા વિરક્ત, જ્ઞાની આણિ પ્રેમળ ભક્ત અસેલ તર
તો અપૂર્વ યોગાચ મ્હણાયલા હવા.

⑥ પરંતુ કાહી ગુણ હે જન્મજાત અસતાત તર કાહી
મુદ્દામ આત્મસાત કરાવે લાગતાત.

રુપ લાવણ્ય અભ્યાસિતા નયે। સહજ ગુણાસ ન ચલે ઉપાયે।
કાહી તરી ધરાવી સોયે। આગંતુક ગુણાંચી ॥૧૮.૬.૧॥

રુપ બદલણે માણસાચ્યા હાતાત નસલે તરી અવગુણ ટાકણે
તર નિશ્ચિતચ શક્ય આહે. આપલ્યા અંતરંગ ચાતુર્ય બાણવણે
કઠીણ અસલે તરી અશક્ય નાહી. આણિ સમાજાતીલ
એકેક વ્યક્તિ સુધારલી તર સમાજાચી ઉન્નતિ હોતે.
મગ હી સુરુવાત આપલ્યા સ્વતઃપાસૂનચ કરાવી, હેચ
ખરે! મનુષ્ય હા સમાજપ્રિય પ્રાણી આહે. જ્યા સમાજાત
આપણ રહતો ત્યા સમાજાચા ~~આપલ્યાવર~~ વ્યક્તીવર વ પ્રત્યેક વ્યક્તીચા
સમાજાવર નિશ્ચિતચ પરિણામ હોત અસતો. પ્રભાવશાલી
વ્યક્તિમત્વ સર્વાનાચ હવેહવેસે વાટતે. મનુષ્યાલા વિવેકાચે વરદાન
લાભલે આહે. ~~દરરોજ~~ આપણ આપલ્યાતીલ ગુણ-અવગુણ
જાણાવે. દરરોજ પાયરી પાયરીને પ્રગતી કરણે શક્ય આહે.
યોગ્ય દિશેને પ્રયત્ન કેલ્યાસ ધ્યેયાપર્યંત નિશ્ચિતચ પોહોચણે
હોતે. નર કરની કરે તો નરકા નારાયણ બન જાએ॥
આપણ સર્વાંશી આદરાને વાગલો સમજુતીને તર લોકહી
આપલ્યાશી તસેચ વાગતાત. (આયુષ્ય હે પૂર્વસંસ્કારરૂપ આહે)

आपण देहाला नटवतो, सजवतो परंतु अंतःकरण शृंगारायचे असेल तर त्यासाठी चातुर्य हवे.

चातुर्ये शृंगारे अंतर | वस्त्रे शृंगारे शरीर |
दोहीं मध्ये कोण थोर | बरें पहा ||
समजले आणि वर्तले | तेचि भाग्यपुरुष जाले |
यावेगळे उरले | ते करंटे पुरुष ||

अशा सज्जन लोकांमुळेच समाजाला बळकटी येते. मूल्यांचे संवर्धन होते. सुसंस्कृत समाजच संघटित/सुरक्षित असतो. अशा आदर्श संस्कृतीचे म्हणजेच आनंदवनभुवनाचे स्वप्न समर्थांनी पाहिले होते. आणि ते स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अशा चातुर्यसंपन्न जनांची संख्या वृद्धिंगत व्हायला हवी हे या समासातून समर्थ सांगत आहेत.

(६) ज्या समाजामध्ये निःस्वार्थी, सद्गुणी, बलवत्तर व्यक्तींची संख्या अधिक असते, तो समाज जिवंत असतो. इतरांसाठी झटणारे लोक ज्या समाजात बहुसंख्य असतात अशा समाजावर होणारे दुष्ट हीन प्रवृत्तींचे आक्रमण सहज परतवून लावता येते. अशा समाजातील लोकांचा गुणगौरव करणारा, दुष्टांना शासन करणारा समर्थ राजा त्यांना उदा. शिवाजी महाराजांच्या रूपाने साक्षात्कारत दिसत होता.

निश्चयाचा महामेरू | बहुत जनांसी आधारू
| श्रीमंत योगी

त्याचबरोबर भारतीय विचारधारेमध्ये चार आश्रम व चार वर्ण सांगितले असले तरी गृहस्थाश्रम हा इतर तिन्ही आश्रमांचा कसा आधार ठरला हे सप्रमाण सांगताना तसेच ब्राह्मणांचा जीवनक्रम कसा असावा हेही समर्थांनी युगधर्मनिरूपण या समासात उदाहरणे देऊन सांगितले आहे.

क्रियाज्ञानाचा विचार | त्याचा ब्राह्मणासीच अधिकार |
वर्णांना ब्राह्मण गुरु | ऐसे वचन ||

© www.madhaveeraghuveer.com

પરંતુ સમર્થાંચ્યા કાળાત બ્રાહ્મણાંચી અવસ્થા દયનીય ઝાલી હોતી. દૈન્યાવસ્થા પ્રાપ્ત ઝાલી હોતી. હીન ગોષ્ટીંપાસૂન ~~[illegible]~~ મન કાઢૂન ઘેઊન ઉચ્ચ ધ્યેયાસાઠી જગાયચે. આપલ્યાબરોબર ઇતરાંના શહાણે કરાયચે હા સ્વર તર બ્રાહ્મણાંચા ધર્મ અસાયલા પાહિજે હોતા. પરંતુ વસ્તુસ્થિતી તશી નવ્હતી.

બ્રાહ્મણ બુદ્ધિપાસૂન ચેવલે | આચારાપાસૂન ભ્રષ્ટ ઝાલે |
ગુરુત્વ સાંડૂન જાલે | શિષ્ય શિષ્યાંચે ||

પરંતુ અશા પ્રતિકૂલ પરિસ્થિતીતહી બ્રાહ્મણાંની આચારધર્મ ન સોડતા ત્યા સર્વ વિશ્વામધ્યે ભરૂન રાહિલેલ્યા વિશ્વંભરાચે ધ્યાન કરાવે. તો જાણીવરૂપાને (સંવિદ) સર્વ ચરાચરાત ભરૂન રાહિલા આહે. યા સૂક્ષ્મ વિવિધતા આહે. પ્રત્યેક પ્રાણ્યાચા દેહ, નાવ, રૂપ, સ્વભાવ ભિન્ન ભિન્ન અસલે તરી અંતઃકરણાચ્યા દૃષ્ટીને વિચાર કેલા તર તો અભેદ અસા પરમાત્મા સર્વત્ર ભરૂન રાહિલા આહે.

(6) ભૂજળતેજસમીરસ્થ રવિ શશિ કાષ્ઠાદિકી અસે ભરલા |
સ્થિરચર વ્યાપુનિ અવઘે તો જગદાત્મા દશાંગુળે ઉરલા ||

સર્વાંચ્યા અંતર્યામી અસણાર્યા યા જાણીવેલા અનુકૂલ કરૂન ઘેણ્યાસાઠી સાધકાને પ્રથમ અંતર્નિષ્ઠ વ્હાયલા હવે. ત્યાચે ધ્યાન ધરાયલા હવે. ધ્યાન હી કાહી કેવળ એકા ઠિકાણી, વિશિષ્ટ આસનાત બસૂન વિશિષ્ટ કાળાત બસણે નવ્હે. તર ધ્યે સમર્થાંના અભિપ્રેત આહે તે અખંડ ધ્યાન | તો દેહધારી વાટત અસલા તરી તો દેહાપાસૂન ભિન્ન આહે દેહ દેવાચે મંદિર | આત આત્મા પરમેશ્વર | વસ્તુતઃ ~~ધ્યાતા~~ આણિ ધ્યેય અસણારા પરમેશ્વર આણિ ધ્યાતા હે મુળાત એકરૂપ આહેત. ઝાણી પુરુષાલા હી અનન્યતા અનુભવતા યેતે. આણિ અસે તાદાત્મ્યાને ત્યાચ્યાશી એકરૂપ હોતા આલે કી ત્યાચે અખંડ ધ્યાન લાગતે. અસા સાધક હા ખરા ભાગ્યવાન! ત્યાચે પરમેશ્વરાશી અખંડ અનુસંધાન

©www.madhaveeraghuveer.com

असत्यामुळे सर्व प्राणी त्याला आपोआप वश होतात.
कारण जो ज्ञानस्वरूप देव सर्व जगात वावरत असतो तोच
आपल्या अंतःकरणात वास करतो. तोच चिरंतन / शाश्वत आहे.
(६) हे संपूर्ण ब्रह्मांड म्हणजे स्वप्नासारखा पसारा आहे. इथे
व्यवहार अज्ञानतेची सरमिसळ झालेली दिसते. परंतु मनुष्याला
विवेकाचे वरदान लाभल्यामुळे असार दूर करून सार तेवढे
घेणे शक्य आहे. या जगात सत् तत्व एकच आहे.
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या / या दृष्टीने सृष्टीचे कौतुक
पहावे. यद् यद् दृश्यं तद् तद् नश्यम् / अर्थात जे नष्ट होणारे
आहे ते सर्व मायेचा खेळ आहे. माया आणिक तर ब्रह्म
पलिकडे. मायेचे महाद्वार ओलांडल्याशिवाय ब्रह्माचे दर्शन घडणे
शक्य नाही. परंतु मायेच्या प्रभावामुळे ब्रह्माचे सिद्धांत समजत
नाहीत. आणि त्यामुळे अंतरात्म राहणारा परमात्मा कधी कोणा
आकलन होत नाही. अतिशय जवळ असणारी मौलिक वस्तू त्याला
सापडत नाही. (अविद्येने ग्रासलेले) या पंचभौतिक वस्तूंचा
शेवटी मूळमायेत लय होतो. मूळमाया ही त्या परब्रह्माची
अभिन्न शक्ती आहे. असार आहे ते निघून जाते व सार/शाश्वत
तेवढे टिकते. जेणे राजा ओळखिला / तो राव म्हणोनि भजल्याला /
जेणे देव " / तो देवरूपी /
ज्याला ज्ञान झाले तो वेगळेपणाने उरतच नाही. तो देवरूप होतो
त्याला माया भुरळ घालू शकत नाही. माया इंद्रियांना खेळवते.
असते एक आणि दिसते भलतेच याचे नाव माया /
माया ही कल्पनामात्र आहे. ती दिसते पण नाश पावते.
ब्रह्म दिसत नाही पण ते असतेच. त्याचा कधीही अभाव होत नाही.
या मायेमुळे भ्रांति होते. फुगडी खेळून त्यावर पृथ्वी फिरत
आहे असे वाटते. स्वप्नात बहुरूपीने राजाचे सोंग घेतले तरी
तो काही खरा राजा नसतो. ते सोंग उतरल्यावर तो सामान्य
माणूसच असतो. तशी ही माया आहे. ही भासमान आहे हे
तत्वतः समजले की मग भ्रांति उरत नाही. ब्रह्मदर्शन घडते

© www.madhaveeraghuveer.com

अशा या अखंडध्यान नावाच्या १४ व्या दशकामध्ये समर्थ रामदास स्वामींनी विविध विषयांवर प्रकाश टाकला आहे. त्यातून उद्बोधन केले आहे. निःस्पृह (महंत) किंवा निरूपण, चातुर्य कवित्व लक्षण या समासांमधून समाजातील आदर्श पुरुष कसा असावा? त्याने समाजासमोर कोणते निरूपण केले पाहिजे याचे उत्तम मार्गदर्शन

कीर्तन, हरिकथा आणि युगधर्म निरूपण यातून उत्तम आचरणासाठी कोणत्या गोष्टी सहाय्यभूत ठरतील हे सांगितले

युगधर्म - तत्कालीन परिस्थितीचे अवलोकन व उपाय

अखंडध्यान व शाश्वत निरूपण - आत्मध्यान कायम व कसे असावे. आध्यात्मिक बैठक असल्या खेरीज समाजाची घडी उत्तमरीतीने बसणे शक्य नाही.

मायानिरूपण - मार्गात येणाऱ्या अडचणी पार केल्यानंतर ब्रह्मदर्शन शक्य आहे.

© www.madhaveeraghuveer.com